सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०७/२०१२-१३

महापालिका सभा दिनांक ११/१०/२०१२ करीता.

गुरुवार दि.११/१०/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.श्री. विजयकुमार धनपाल हाबळे, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिकेच्या वतीने महापालिका क्षेत्रात खोकी बसविणेत आली होती. व त्यांना रितसर व्यवसाय परवानाही देण्यात आला होता. सन २००७ साली महापालिका क्षेत्रात अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन व राष्ट्रपती यांचा दौऱ्यामुळे महापालिकेने प्रत्येक चौकातील खोकी धारकांना विश्वासात घेऊन महापालिका अधिकाऱ्यांनी खोकी काढण्यास प्रवृत्त केले व त्यांना सहा महिन्यात खोक्यांचे पुर्नवसन करु असे आश्वासन ही दिले होते. त्यावेळी खोकी धारकांनी पुर्नवसनासाठी बँकेतुन कर्ज काढुन व घरातील दाग दागीने गहान ठेऊन पुर्नवसनाची रक्कम भरली होती.

त्यानुसार आज अखेर कांही खोकी धारकांची कोणत्याही खोक्याचे पुर्नवसन महापालिकेकडून केले गेले नाही. व त्यांचे आज अखेर कोणतेही खोके वापरात नसताना महापालिकेकडून मागणी पत्र देऊन खोके भाडे भरणेबाबत मागणी होत आहे. ही बाब नैसर्गीक हक्कास बाधा आणणारी व खोके अस्तित्वात नसताना भाडे मागणी करणे न्याय संगत नाही. तरी, सदर पुर्नवसनामध्ये ज्या खोके धारकांची खोकी काढुन घेणेत आली आहेत अद्याप त्यांचे पुर्नवसन करण्यात आलेले नाही. अशा खोकी धारकांचे मागील व पुर्नवसन होई पर्यंत भाडे मागणीपत्र रद्द करणे व ज्या खोकी धारकांचे अद्याप पुर्नवसन झालेले नाही त्यांचे तात्काळ पुर्नवसनाची कार्यवाही करणे बाबत आलेला प्रस्ताव.

२.मा.श्री. विजयकुमार धनपाल हाबळे, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात सांगली शहरात संस्थान कालीन श्री गणेश मंदिर आहे. सांगली शहराला श्री गणेशाची नगरी असेही संबोधले जाते. सांगलीतील श्री गणेशावर अनेक भक्त जणांची श्रध्दा आहे. म्हणूनच प्रत्येक संकष्टी अथवा गणेश चतुर्थीच्या काळात शेकडो किलोमीटर वरुन भावीक व परदेशातील नागरीक दर्शनासाठी येत असतात. अस्तित्वात असनारे गणपती मंदिर हे संस्थान कालीन व आकर्षक असे आहे. यासोबतच हे मंदिर कृष्णाकाठी असलेने या परिसराचा नियोजन बध्द विकास होणे अपेक्षित आहे. यासाठी शासनाने सांगली शहराचा परिसर तीर्थक्षेत्र म्हणून घोषीत करावा व शासनाच्या तिर्थ क्षेत्र विकासनिधीतून निधी उपलब्ध करुन द्यावा यासाठी महापालिकेकडून सांगली तीर्थक्षेत्र विकासाचा आराखडा तयार करणेकामी अनुभवी असणाऱ्या एजन्सी नेमुन प्रस्ताव शासनास सादर करणेस मान्यता देणे बाबत आलेला प्रस्ताव.

३. मा.श्री. हणमंत बंडूजी पवार , यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली नगरी ही गणरायाची नगरी म्हणून इतिहास काळा पासून प्रसिध्द आहे. परराज्यातील व देशा परदेशामधून आलेले पर्यटक सांगलीतील संस्थान कालीन श्री गणेश मंदिर पाहण्यासाठी येत असतात. म्हणून सदर मंदिर परिसरातील रस्ते कृष्णा काठ, हरीपूर मधील गणपती मंदिर व संगमेश्वर मंदिर परिसर तिर्थ क्षेत्र म्हणून जाहिर करावा व विकसित करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव देणे कामी चर्चा करुन निर्णय घेणे बाबत आलेला प्रस्ताव.

४. मा.श्री. प्रमोद प्रकाशराव सुर्यवंशी, यांनी दिलेला प्रस्ताव :-

प्रभाग क्र. १५ मधील मगरमच्छ कॉलनी घाणे गल्लीत असलेली सार्वजनिक मुतारी चारी बाजुनी पडलेली असून, लगतच सुलभशौच्यालय असलेमुळे सदर मुतारीचा वापर कोणीही करीत नसून मोकाट जनावरांचा अड्डा बनला आहे. त्यामुंळे दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून, रहदारीसही सदर मुतारीचा अडथळा होत आहे. त्यामुळे सदर ठिकाणच्या रहिवाशांनी सदरची पडीक मुतारी तातडीने काढणे विषयी वारंवार तगादा लावला आहे. सदरची पडीक मुतारी तातडीने काढुन टाकणे बाबत चर्चाकरुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : ०६/१०/२०१२.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- ११/१०/२०१२

ठराव क्रमांक :- ४२१

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विजयकुमार धनपाल हाबळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या वतीने महापालिका क्षेत्रात खोकी बसविणेत आली होती. व त्यांना रितसर व्यवसाय परवानाही देण्यात आला होता. सन २००७ साली महापालिका क्षेत्रात अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन व राष्ट्रपती यांचा दौऱ्यामुळे महापालिकेने प्रत्येक चौकातील खोकी धारकांना विश्वासात घेऊन महापालिका अधिकाऱ्यांनी खोकी काढण्यास प्रवृत्त केले व त्यांना सहा महिन्यात खोक्यांचे पुर्नवसन करु असे आश्वासन ही दिले होते. त्यावेळी खोकी धारकांनी पुर्नवसनासाठी बँकेतुन कर्ज काढुन व वरातीत दाग दागीने गहान ठेऊन पुर्नवसनाची रक्कम भरली होती.

त्यानुसार आज अखेर काही खोकी धारकांची कोणत्याही खोक्याचे पुर्नवसन महापालिकेकडुन केले गेले नाही. व त्यांचे आज अखेर कोणतेही खोके वापरात नसताना महापालिकेकडुन मागणी पत्र देऊन खोके भाडे भरणेबाबत मागणी होत आहे. ही बाब नैसर्गीक हक्कास बाधा आणणारी व खोके अस्तित्वात नसताना भाडे मागणी करणे न्याय संगत नाही. तरी, सदर पुर्नवसनामध्ये ज्या खोके धारकांची खोकी काढुन घेणेत आली आहेत अद्याप त्यांचे पुर्नवसन करण्यात आलेले नाही. अशा खोकी धारकांचे मागील व पुर्नवसन होई पर्यंत भाडे मागणीपत्र रद्द करणे व ज्या खोकी धारकांचे अद्याप पुर्नवसन झालेले नाही त्यांचे तात्काळ पुर्नवसनाची कार्यवाही करणेस ही सभा प्रस्तावानुसार मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर.

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- ११/१०/२०१२

ठराव क्रमांक :- 922

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विजयकुमार धनपाल हाबळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात सांगली शहरात संस्थान कालीन श्री गणेश मंदिर आहे. सांगली शहराला श्री गणेशाची नगरी असेही संबोधले जाते. सांगलीतील श्री गणेशावर अनेक भक्त जणांची श्रध्दा आहे. म्हणूनच प्रत्येक संकष्टी अथवा गणेश चतुर्थीच्या काळात शेंकडो किलोमीटर वरुन भावीक व परदेशातील नागरीक दर्शनासाठी येत असतात. अस्तित्वात असनारे गणपती मंदिर हे संस्थान कालीन व आकर्षक असे आहे. यासोबतच हे मंदिर कृष्णाकाठी असलेने या परिसराचा नियोजन बध्द विकास होणे अपेक्षित आहे. यासाठी शासनाने सांगली शहराचा परिसर तीर्थक्षेत्र म्हणून घोषीत करावा व शासनाच्या तिर्थ क्षेत्र विकासनिधीतून निधी उपलब्ध करुन द्यावा यासाठी महापालिकेकडून सांगली तीर्थक्षेत्र विकासाचा आराखडा तयार करणेकामी अनुभवी असणाऱ्या एजन्सी नेमुन प्रस्ताव शासनास सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

शहर अभियंता

सहा. नगरचना,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- ११/१०/२०१२

ठराव क्रमांक :- 923

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.हणमंत बंडूजी पवार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली नगरी ही गणरायाची नगरी म्हणून इतिहास काळा पासून प्रसिध्द आहे. परराज्यातील व देशा परदेशामधून आलेले पर्यटक सांगलीतील संस्थान कालीन श्री गणेश मंदिर पाहण्यासाठी येत असतात. म्हणून सदर मंदिर परिसरातील रस्ते कृष्णा काठ, हरीपूर मधील गणपती मंदिर व संगमेश्वर मंदिर परिसर तिर्थ क्षेत्र म्हणून जाहिर करावा व विकसित करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

शहर अभियंता

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०७ दिनांक :- ११/१०/२०१२

ठराव क्रमांक :- 928

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.प्रमोद प्रकाशराव सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

प्रभाग क्र. १५ मधील मगरमच्छ कॉलनी घाणे गल्लीत असलेली सार्वजनिक मुतारी चारी बाजुनी पडलेली असून, लगतच सुलभशौच्यालय असलेमुळे सदर मुतारीचा वापर कोणीही करीत नसून मोकाट जनावरांचा अड्डा बनला आहे. त्यामुळे दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असून, रहदारीसही सदर मुतारीचा अडथळा होत आहे. त्यामुळे सदर ठिकाणच्या रहिवाशांनी सदरची पडीक मुतारी तातडीने काढणे विषयी वारंवार तगादा लावला आहे. सदरची पडीक मुतारी तातडीने काढून टाकणेस प्रस्तावानुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

शहर अभियंता

नगर अभियंता
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.